म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ३६२

काशक.

मराठी ग्रंथावली सं. २३८

# ज्ञात शब्द रत्नमाला.

म. ग्रं. सं. ठाणें

| विषय | लेखक | सन |
|---|---|---|
| काव्य | श्री संत्रीनाथ श्री नारद | १९०० |
| संग्रहालय क्रमांक | पुस्तकाचें नांव | |
| ३९५ | ३६२ ज्ञात शब्द रत्नमाला | |

३२५

चारक सभेनें

ंत

न्यांत छापवून

केलें

स्वाधीन ठेविले आहेत.

१९१६

किंमत पाऊण आणा.

रतीही वेदाहीं अनुमत मतीं ठेवित नसे ॥
अधर्मैं तो वागे ह्मणति जन त्या सर्वहि असें ॥ १ ॥

४ पुण्य-श्लोक ( वसंततिलका. )

विद्यादि मुख्य शुभकारक सद्गुणांचें ॥
सोत्साह दान; वदनांतरिं सत्य नाचे ॥
आचार सत्य करणें असल्या क्रियेला ॥
शंका त्यजून अवघ्या तुह्मि पुण्य बोला ॥ १ ॥

५ पाप-श्लोक ( वसंततिलका )

पुण्याविरुद्ध करणें अवघें जगांत ॥
सत्यांश नाच धरणें कधि ही मनांत ॥
आचार वाइट करून सदा रहावें ॥
कृत्यांप्रती ह्मणुन पाप तया वदावें ॥ १ ॥

६ सत्यभाषण-श्लोक ( उपजाती )

असेल जें ठाउक आपणास ॥
तसें न शंकेचि वदावयास ॥
टाकून दोषांस असंभवादि ॥
बोले; तया सत्य ह्मणाच आर्यीं ॥ १ ॥

७ मिथ्याभाषण-आर्या.

सत्याचें वर्णन जें केलें व्याख्या करूनिया वरतें ॥
त्या त्या विरुद्ध सगळी समजा मिथ्योक्ति हें मनीं पुरतें ।१

से.०, – २०८



८ विश्वास–आर्या.

अर्थ जयाचा मूलहि तैसें फल निश्चयेंचि विश्वास ॥
वाटे खरें ह्मणूनी बुधजन वदतात त्यास विश्वास ॥ १ ॥

९ अविश्वास–साकी.

विश्वासाच्या व्याख्येमाजी जें जें कथिलें त्यास ॥
विरुद्ध जितकें असेल त्याला वदतात अविश्वास ॥ १ ॥

१० परलोक–आर्या.

सद्विद्येच्या योगें परमेश्वर प्राप्ति लौकरी होते ॥
त्या प्राप्तीच्यायोगें ह्या जन्मीं सौख्य मानवा मिळतें॥ १॥
हेंच नव्हे केवळ हो सौख्य पुनर्जन्मि प्राप्त होय महा ॥
मोक्षीं तसेंच सुखही वदती परलोक ऐशियास पहा॥ २॥

११ अपरलोक–आर्या.

परलोकाच्या उलटें असुन जयामाजिं भोगणें दुःख ॥
लागे बहुत ह्मणूनी वदताती त्यास कीं अपरलोक ॥ १॥

१२ जन्म–आर्या.

कोणा एका देहीं जीव शिरूनी समर्थ होय जयीं ॥
कर्म करायासाठीं बुधजन ह्मणतात त्यास जन्म तयीं। १।

१३ मरण–आर्या.

जीव शरीरीं मिळुनी कर्म करी कांहिं काल पर्यंत ॥
नंतर वियोग होई त्या समया मरण बोलती संत ॥ १ ॥

१४ स्वर्ग–श्लोक ( वसंततिलका )

जेथें विशेष सुख हो मिळतें सदाही ॥
दुःखास आश्रय नसे अणुमात्र कांहीं ॥

# प्रस्तावना.

अलीकडे बऱ्याच विद्वानांच्या तसेंच साधारण माहितीच्या मनुष्याच्या मनांत धर्म काय आहे व त्याचें मूळ कोठें आहे हें शोधून काढावयाचें आलें आहे. तथापि विचार करणाऱ्या मंडळीस प्रथम दर्शनीं कांहीं निश्चय नसल्यामुळें वाक्यार्थांत विरोध नसतांही तो भासूं लागतो व विचारसरणीची दिशा वारंवार बदलणें भाग पडतें एकमेकांला विरुद्ध अशीं मतमतांतरें त्यांच्या दृष्टीस पडतात व पुष्टीकरणार्थ वाक्येंही आढळतात ह्मणून कांहींच निश्चय करण्याचें साधन अशा सत्यशोधक विद्वानांस लाभत नाहीं; त्यामुळें विचार करण्याची शैली युरोपिअन लोकाप्रमाणे ठेवावी लागते. पाश्चिमात्य पद्धतीनें पौरस्त्य विचारांचें व सिद्धांतांचें रहस्य यथासांग कळणें दुर्घट आहे. याकरितां हल्लीं अनिश्चित वाटणाऱ्या कांहीं शब्दांच्या व्याख्या मान्य ग्रंथाधारें सयुक्तिक रीतीनें मराठींत कवितावद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. यश देणें ईश्वराधीन आहे. शम्.

ओ३म्

# शत शब्द रत्नमाला.

१ ईश्वर–श्लोक ( शार्दूल विक्रीडित )

ज्याचें कर्म खरें स्वभावहि खरा राहे गुणीं सत्यता॥
ज्याचें सत्य असे स्वरूप जगता जो एकला निर्मिता॥
आहे चेतनमात्र वस्तु कसला आकार ज्यातें नसे॥
ज्यातें आदिन, अद्वितीय, जगता व्यापूनिया जो असे॥
नाहीं नाश जया, अनंत गुणवान् जो शक्तिमान् शुद्धही॥
ज्याचें काम जगास निर्मुनि लया ने पाळुनी, ज्ञानि ही॥
जो देई फल पाप पुण्य बघुनी प्राण्यांप्रती सर्वदां॥
त्यातें ईश्वर बोलती अजहि जो मृत्यू नसे ज्या कदां॥२॥

२ धर्म—साकी.

स्वरूप ज्याचें आज्ञा पालन यथायोग्य ईशाची॥
करणें, न्यायहि पक्ष न धरितां कोणाचा तैसाची॥१॥
प्रत्यक्षादि प्रमाणें करुनी सुपरिक्षित वेदोक्त॥
सकल जनांचें हित करणें हें ऐसें आहे उक्त॥ २॥
व्याख्या ही धर्माची। आहे जनहो साची॥

३ अधर्म—श्लोक ( शिखरिणी. )

त्यजी ईशाज्ञेनें त्यजि कधिं न दोषा खलमती॥
धरी हट्टा मोठ्या परि करि न जो न्याय जगतीं॥

रतीही वेदाहीं अनुमत मतीं ठेवित नसे ॥
अधर्मैं तो वागे ह्मणति जन त्या सर्वहि असें ॥ १ ॥

### ४ पुण्य–श्लोक ( वसंततिलका. )

विद्यादि मुख्य शुभकारक सद्गुणांचें ॥
सोत्साह दान; वदनांतरिं सत्य नाचे ॥
आचार सत्य करणें असल्या क्रियेला ॥
शंका त्यजून अवघ्या तुह्मि पुण्य बोला ॥ १ ॥

### ५ पाप–श्लोक ( वसंततिलका )

पुण्याविरुद्ध करणें अवघें जगांत ॥
सत्यांश नाच धरणें कधिं ही मनांत ॥
आचार वाइट करून सदां रहावें ॥
कृत्यांप्रती ह्मणुन पाप तया वदावें ॥ १ ॥

### ६ सत्यभाषण–श्लोक ( उपजाती )

असेल जें ठाउक आपणास ॥
तसें न शंकेचि वदावयास ॥
टाकून दोषांस असंभवादि ॥
बोले; तया सत्य ह्मणाच आर्धी ॥ १ ॥

### ७ मिथ्याभाषण–आर्या.

सत्याचें वर्णन जें केलें व्याख्या करूनिया वरतें ॥
त्या त्या विरुद्ध सगळी समजा मिथ्योक्ति हें मनीं पुरतें ॥ १

### ८ विश्वास–आर्या.

अर्थ जयाचा मूलहि तैसें फल निश्चयेंचि विश्वास ॥
वाटे खरें ह्मणूनीं बुधजन वदतात त्यास विश्वास ॥ १ ॥

### ९ अविश्वास–साकी.

विश्वासाच्या व्याख्येमाजी जें जें कथिलें त्यास ॥
विरुद्ध जितकें असेल त्याला वदतात अविश्वास ॥ १ ॥

### १० परलोक–आर्या.

सद्विद्येच्या योगें परमेश्वर प्राप्ति लौकरी होते ॥
त्या प्राप्तीच्यायोगें ह्या जन्मीं सौख्य मानवा मिळतें॥ १॥
हेंच नव्हे केवळ हो सौख्य पुनर्जन्मि प्राप्त होय महा ॥
मोक्षीं तसेंच सुखही वदती परलोक ऐशियास पहा॥ २॥

### ११ अपरलोक–आर्या.

परलोकाच्या उलटें असुन जयामाजि भोगणें दुःख ॥
लागे बहुत ह्मणूनी वदताती त्यास कीं अपरलोक ॥ १ ॥

### १२ जन्म–आर्या.

कोणा एका देहीं जीव शिरूनी समर्थ होय जयीं ॥
कर्म करायासाठीं बुधजन ह्मणतात त्यास जन्म तयीं। १।

### १३ मरण–आर्या.

जीव शरीरीं मिळुनी कर्म करी कांहिं काल पर्यंत ॥
नंतर वियोग होई त्या समया मरण बोलती संत ॥ १ ॥

### १४ स्वर्ग–श्लोक ( वसंततिलका )

जेथें विशेष सुख हो मिळतें सदाही ॥
दुःखास आश्रय नसे अणुमात्र कांहीं ॥

जीवा मिळे बहुत संचय कीं सुखाचा ॥
त्या बोलती सकल सज्जन स्वर्ग साचा ॥ १ ॥

## १५ नरक–आर्या.

दुःखाची सामग्री जेथें जीवाप्रती सदा असुख ॥
भोगावें लागेची बुधजन वदती तयाप्रती नरक ॥ १ ॥

## १६ विद्या–आर्या.

जीच्या योगेंकरुनी देवापासून पृथ्विपर्यंत ॥
सकलाही वस्तूंचें होतें हो ज्ञान मानवा सत्य ॥ १ ॥
तैसेंच त्या पदार्थां पासुन उपकार बोध जो उचित ॥
घेण्याचें कळतें तिस विद्या पंडीत बोलती सत्य ॥ २ ॥

## १७ अविद्या–आर्या.

विद्येहुन विपरित जी भ्रम तम अज्ञान रूपही असती ॥
बुधजन सकलहि लोकीं खचित अविद्या तियेप्रती वदती।

## १८ सत्पुरुष–श्लोक ( शार्दूलविक्रीडित )

मोठें संकट ओढवे तरि न जो सत्यास सोडी कदा ॥
धर्मात्मा असुनी तसा परहिता जो वाहिला सर्वदा ॥
जो विद्वान् शुचि, शांति हा गुण वसे आंगीं जयाचे सदा।
ऐसा जो गुणि युक्त, सत्पुरुष ह्या शोभे महा सत्पदा ॥ १ ॥

## १९ सत्संग–आर्या.

ज्याच्या योगेंकरुनी खोट्यापासून सुटुनयां अंतीं ॥
सत्य प्राप्तिहि होते त्यातें सत्संग बुधमणी वदती ॥ १ ॥

## कुसंग–आर्या.

ज्याच्या योगेंकरुनी जीव फसे जाउनी महानरकीं ॥
वदताती बुध सर्वहि त्यातें समजा कुसंग हो नरकीं॥१॥

## २० तीर्थ–आर्या.

विद्याभ्यास तसेंची धर्मानुष्ठान सद्विवेक बरा ॥
ईश्वर भक्ती इंद्रिय–निग्रहता आणि सत्य संग खरा॥१॥
तैसेंच ब्रह्मचर्या प्रति लोकीं तीर्थ बोलती सुजन ॥
कारण त्यांच्यायोगें दुःखार्णव जीव जातसे तरुन ॥ २ ॥

## २१ स्तुति–आर्या.

ईश्वर किंवा दुसऱ्या वस्तूचे वर्णना यथोचित हो ॥
करणें सत्य कथूनी सज्जन त्या बोलतात कीं स्तुति हो।१

## २२ स्तुतीचें फल–आर्या.

वस्तूचें वर्णन वा ईश्वर गुण वर्णनें जडे प्रीती ॥
त्या त्या वस्तूवरती स्तवनाचें फल तयाप्रती ह्मणती॥१॥

## २३ निन्दा–आर्या.

मिथ्या ज्ञान तसेंची मिथ्योक्ती करुन आग्रहें सुगुणा ॥
टाकुन त्या स्थलिं अवगुण लाविति निन्दा तया प्रतीच ह्मणा१

## २४ प्रार्थना–आर्या.

होइल तितुका पूर्णचि करुनी पुरुषार्थ आपल्या कडुनी ॥
त्यानंतर उत्तम कीं कर्माची सिद्धि व्हावी हो ह्मणुनी ॥१॥
जो जन समर्थ त्याचे साह्यास्तव याचना वहुत करिती ॥
अथवा परमेशाचे; बुधजन त्या प्रार्थना असें ह्मणती ॥२॥

## २५ प्रार्थनेचें फल–श्लोक ( अनुष्टुप )

होउनी नाश गर्वाचा । जें आत्मा आर्द्रता धरी ॥
गुण ग्रहणाची तेणें । ये पुरुषार्थता खरी ॥ १ ॥

तैसीच प्रीति उत्पन्न । होतसे मग अंतरीं ॥
बुध जन प्राथनेचें । फल त्या बोलती तरी ॥ २ ॥

## २६ उपासना–आर्या.

जीच्या योगें अपुला आत्मा ईश स्वरूपिं लावूनी ॥
होती निमग्न हर्षें कविजन वदती उपासना ह्मणुनी ॥१॥

## २७ निर्गुण उपासना–श्लोक ( अनुष्टुप )

शब्द स्पर्श रूप रस । जन्म मृत्यूहि आणिक ॥
गंध वियोग संयोग । तैसाचि गुण असुख ॥ १ ॥
अविद्या हलके भारी । इत्यादि गुण नाहिंत ॥
ईश्वराची अशा भक्ति । बोला निर्गुण भक्तिती ॥२॥

## २८ सगुणोउपासना–आर्या.

जो सर्व शक्ति शुद्धाहि नित्यानंदी असून जगकर्ता ॥
एक सनातन सर्वा–धार तसा संकटांसि जो हर्ता ॥ १ ॥
सर्व व्यापक सर्व–स्वामि नियंता तसाच सर्वांचा ॥
मंगलमय सर्वांनां मोदप्रद सकल जनक जो सांचा ॥ २ ॥
सदय तसा न्यायाचा कर्त्ता इत्यादि गुणमया प्रभुची ॥
करिती उपासना जी वदती बुध तीस सगुण ईशांची ॥ ३ ॥

## २९ मुक्ति–आर्या.

जीच्यायोगें करुनी संकट समुदाय लौकरी सुटुनी ॥
जन्म मरण दुःखाचा सागर नर जाय सहज उतरूनी ॥१॥

नंतर होते प्राप्ती जगत्पित्याची सदैव देवाची ॥
ह्या योगें सुख पावे मुक्ती त्या बोलतात बुधसाची ॥ २ ॥

### ३० मुक्तीचें साधन—श्लोक ( उपजाति )

करून पूर्वोक्त उपासनेला ॥ तैसेंच हो ईश्वर प्रार्थनेला ॥
पुण्याप्रती आचरुनी हिधर्म॥करीत जावें सहजीं सुकर्म॥१॥
धरी सदा संगत सज्जनाची॥स्पर्शू नको सावलि दुर्जनाची ॥
परोपकारादि करून राहें।त्या बोलती साधन मुक्तिचें हें ॥२॥

### ३१ कर्त्ता—आर्या.

सर्वहि निज कार्यातें निज तंत्रें शक्त जो करायास ॥
ज्याच्या स्वाधिन सर्वचि साधन; कर्त्ता पहा वदति त्यास१

### ३२ कारण—आर्या.

ज्याच्यायोगें कर्त्ता कार्याचा कोणत्याहि वस्तूला ॥
समर्थ होय कराया कारण ह्मणतात सुज्ञ कीं त्याला ॥ १॥

### श्लोक ( अनुष्टुप )

प्रकार त्या कारणाचे । असती तीन हो बरे ॥
निमित्त ही उपादान । साधारणाचि तीसरें ॥ १ ॥

### ३३ उपादान कारण—आर्या.

जी वस्तू घेउनिया तीच्यायोगें पदार्थ कीं दुसरे ॥
उत्पन्न होति तिजला ह्मणति उपादान सुज्ञ कीं सारे॥१॥

### ३४ निमित्त कारण—आर्या.

जैसा कुंभार घटा घडितो तैसाच जो पदार्थातें ॥
करणार त्यास सर्वहि पंडित वदती निमित्त कारण तें।१

३५ साधारण कारण—आर्या.

दंडादिक वस्तूंतें आकाशा आणखी दिशा ह्यांस ॥
साधारण कारणकीं वदती तैसेंच हो प्रकाशास ॥१॥

३६ कार्य—आर्या.

योग विशेषें करुनी आकृति येऊन कामिं हो पडतें ॥
ह्मणुनी योग्य कराया कार्य वदति सुज्ञ कारणाचें तें॥१॥

३७ सृष्टि—आर्या.

कारण द्रव्यें कांहीं योग विशेषें करून कार्याच्या ॥
कार्यरूप पावतितें रचना योगें करून कर्त्याच्या॥ १ ॥
तदनंतर व्यवहारीं कामीं पडती ह्मणोन तीं उचित॥
त्या सर्वां प्रति सृष्टी वदताती सकल सूज्ञ कीं खचित॥२॥

३८ जाति—आर्या.

आजन्म मरण ज्यामधिं ईश्वर कृत व्यक्ति सारख्या असती ॥
गो मानव वृक्षादी समुदाया जातिकीं असें ह्मणती ॥ १ ॥

३९ मनुष्य—आर्या.

विवेक केल्या वांचुनि जो न करी कोणत्याहि कामातें ॥
ह्मणवुनि पंडित सर्वहि वदताती हो मनुष्यची त्यातें ॥ १ ॥

४० आर्य—आर्या

श्रेष्ठ स्वभाव ज्याचा धर्मात्मा जो परोपकारिं रती ॥
धरि, सत्यविद्य असुनी विनय गुणें करुनि शोभला सुमती॥१॥
सहसा न वदे अनृता ज्याची सत्यावरी सदा प्रीती ॥
राहे आर्यावर्ती सदैव त्या आर्य बुध असें वदती ॥ २ ॥

स. ३/०-२२०



### ४१ आर्यवर्त देश–आर्या.

सर्वश्रुत विंध्याचल ख्यात हिमालय तसाच अद्रिमधीं ॥
सिंधु नदी तिसरी हो चवथी विख्यात ब्रह्मपुत्र नदी ॥ १ ॥
ह्या चारीमधिं किंवा ह्यांचा विस्तार जेथ पर्यंत ॥
आहे त्याला ह्मणती आर्यावर्ताख्य देश कीं संत ॥ २ ॥

### ४२ दस्यु–आर्या.

आर्य नव्हे ह्मणजे जो मूर्ख असूनी स्वभाव ही ज्याचा ॥
आर्या विरुद्ध तैसा नेम असे वेगळे रहायाचा ॥ १ ॥
जो दुष्ट चोर डाकू धांवे हिंसा करावयास अती ॥
त्याला बुध निःशंकें दस्यु असें सर्वकाल हो वदती ॥ २ ॥

### ४३ वर्ण–आर्या.

गुण कर्मांच्या योगें जो कीं स्थितिलाभ जोडिला जातो ॥
तेथें समजा बुधहो सत्य तुह्मी वर्ण शब्द हा होतो ॥ १ ।

### ४४ वर्णाचे भेद–आर्या.

पहिला ब्राह्मण दुसरा क्षत्रिय तैसाचि वैश्य होय तिजा ॥
आणीक शूद्र चवथा वर्णाचे चार भेद हे समजा ॥ १ ॥

### ४५ आश्रम–आर्या.

अत्यंत कष्ट करुनी उत्तम गुण घ्यावयाप्रती स्थान ॥
कर्म श्रेष्ठ कराया आश्रम त्या बोलतात साधुजन ॥ १ ॥

### ४६ आश्रमाचे भेद–श्लोक ( पृथ्वी )

#### ब्रह्मचर्याश्रम.

**शरीर बल मेळवी शुभगुणां सुविद्या व्रतीं ॥**
**जितेंद्रिय सदा असे करित आत्मिका उन्नती ॥**

प्रसन्न मन ठेवुनी जायें निवारि सर्व भ्रम ॥
तयास जन बोलती सकल ब्रह्मचर्याश्रम ॥

गृहस्थाश्रम–श्लोक ( उपेंद्रवज्रा )

सुबोध कीं जेथ जगास देई ॥
करीत सिद्धी व्यवहारिं राही ॥
वंशास विस्तारि सुविघ्न होई ॥
गृहाश्रमा त्या वदताति पाहीं ॥ १ ॥

वानप्रस्थाश्रम–श्लोक ( उपजाति )

व्यापूनियां जो जगतीं असे हो ॥
त्याच्या स्थितीचा स्वसुखार्थ लाहो ॥
व्हावा ह्मणूनी नर यत्न जेथ ॥
करीतसे त्या वद वानप्रस्थ ॥ १ ॥

संन्यासाश्रम–श्लोक ( इंद्रवज्रा )

जेथें नरें सर्व हिता झटावें ॥
टाकूनि अर्था निज शांत व्हावें ॥
त्यागास ऐशा बुध बोलताती ॥
संन्यास बंधो त्यज सर्व भ्रांती ॥ १ ॥

४७ यज्ञ–आर्या

जाणा अग्नीहोत्रा पासुनि जे अश्वमेध पर्यंत ॥
वा शिल्प पदार्थादी विज्ञाना यज्ञ बोलती संत ॥ १ ॥
अपुल्या हातुन उपकृति होय यथा शक्ति जेव्हढी जगतीं॥
तितक्या उपकारातें सुज्ञ पहा यज्ञ नांव हें देती ॥ २ ॥

ग्रं. क्र. ११०



### ४८ कर्म--आर्या.

जीव शरीरीं तैसा मानासिं आणीक इंद्रिय गणांत ॥
चेष्टा विशेष करितो त्याला पंडीत कर्म ह्मणतात ॥ १ ॥
त्याचे प्रकार किंवा पंडित जन भेद तीन हो करिती ॥
शुभ एक अशुभ दुजा तिसऱ्याशीं मिश्र नांव हें देती॥२

### ४९–५० क्रियामाण व संचित–आर्या.

क्रियमाण कर्म ह्मणती घडतें जें वर्तमान कालांत ॥
तें ज्ञानांत मिळे तै संचित संस्कार त्यास ह्मणतात ॥१॥

### ५१ प्रारब्ध–आर्या.

पूर्वार्जित कर्माचें सुख किंवा दुःख भोगलें जाय ॥
बुधजन त्यास ह्मणुनिया वदती प्रारब्ध दूसरें काय ॥१॥

### ५२ अनादि पदार्थ–आर्या.

ईश्वर जीव तसेंची कारण जें होय सर्व जगताचें ॥
ह्या तीन पदार्थांतें ह्मणताती बुध अनादि हें साचें ॥ १ ॥

### ५३ प्रवाहानें आनादि पदार्थ–आर्या.

कार्य जगत् जीवांचीं कर्में त्यांचा वियोग संयोग ॥
असताति वरिल जाणा पर्यायानें आनादि तिन भाग॥१॥

### ५४ अनादिचे स्वरूप–आर्या.

उत्पत्ति नसे ज्यातें अथवा कारण नसेचि ज्या कांहीं ॥
स्वयमेव सिद्ध ऐशी यातें वदती अनादि कीं पाहीं ॥१॥

### ५५ पुरुषार्थ–श्लोक ( वसंततिलका. )

**व्हावी ह्मणूनि सकला व्यवहारिं सिद्धि ॥**
**आळस्य दूर करुनी धरुनी सुबुद्धी ॥**

धाणी शरीर धन यांनिं करी झटून ॥
उद्योग; त्यास वदती पुरुषार्थ जाण ॥ १ ॥

५६ पुरुषार्थाचे भेद–श्लोक ( वसंततिलका. )

अप्राप्त वस्तुस झटे मिळवावयास ॥
जी प्राप्त जाहलि तियेप्रति रक्षणास
खर्ची करी करुन वृद्धि परोपकारीं ॥
उद्योग भेद वदती बुध ह्यास चारी ॥ १ ॥

५७ परोपकार–आर्या.

अन्य प्राणिसुखास्तव तन मन खर्ची करी प्रयत्न यदा ॥
वेंची धन त्याच परी सत्कृत्या त्या परोपकार वदा ॥१॥

५८ शिष्टाचार--आर्या.

शुभ गुण जितके असती तितुके घेऊन ज्यांत अशुभांचा॥
त्यागचि केला जातो आचार ह्मणा तयास शिष्टांचा ॥१॥

५९ सदाचार--आर्या.

सृष्टीची उत्पत्ती झाल्यापासून आज पर्यन्त ॥
सत्पुरुष करित आले धैर्यें आचार, जोहि वेदोक्त ॥ १ ॥
कीं ज्यांत असत्याचा त्याग करूनी धरूनि सत्यास ॥
वागति संतत पाहीं बुधजन ह्मणती सदाचरण त्यास ॥२॥

६० विद्या पुस्तक--श्लोक ( अनुष्टुप. )

ईश्वरोक्त सनातन सत्य विद्यामय अती ॥
ऐशा ह्या चार वेदांतें विद्या पुस्तक बोलती॥१॥

### ६१ आचार्य—आर्या.

श्रेष्ठाचारें वागुनि सकला विद्येप्रती सहज शिकवी ॥
उत्साहें करुनि अती ह्मणति आचार्य ह्मणुन त्यासि कवी ॥१॥

### ६२ गुरु—आर्या.

वीर्याच्या दानानें देहोत्पत्ती करूनि वाढविता ॥
देऊन सुभोजनादिक पाळी, गुरु वा तयास वदति पिता ॥१॥
वा सदुपदेश करुनी अज्ञान तमासि जो सदा हटवी ॥
हृदयांतिल सर्व ज्ञणी; ह्मणताती गुरु तयाप्रती सुकवी ॥२॥

### ६३ अतिथी—आर्या.

येण्याची जाण्याची तिथि निश्चित ही नसेच कीं ज्याची ॥
विद्यायुत होउन धरि इच्छा सर्वत्र जो फिरायाची ॥ १ ॥
उपदेश सर्व जीवां करुनी उपकार ही दुजावरती ॥
शक्त्यनुरूप करीजो वदती त्या प्रति सदा कवी अतिथी ॥२॥

### ६४ पंचायतन पूजा—आर्या.

जीवंत जनक माता अतिथी आचार्य आणखी देव ॥
पंचायतन असें हें ह्यासचि बुध देति हो खरें नांव ॥ १ ॥
करुनि यथा योग्य बरा सत्कारा त्यां प्रसन्न करि त्यास ॥
पंचायतन पूजा कीं ह्मणती बुध सर्व हो असें खास ॥ २ ॥

### ६५ पूजा—आर्या.

ज्ञान प्रभृति गुणांहीं जो नरमंडित तयासि कीं देती ॥
मान करुनि सत्कारा करिती; पूजा तयास हो वदती ॥ १॥

### ६६ अपूजा—आर्या

ज्ञान रहित ऐसा जो पदार्थ जड ज्या उचित नसे कांहीं ॥
सत्कार त्या; अपूजा करणें कथिलें असेंचि सुजनांहीं ॥१॥

### ६७ जड—आर्या

ज्ञानि प्रभृति गुणांनीं विरहित लोकांत वस्तु जे असती ॥
त्या सर्व वस्तुंला कीं जड ऐसें सुज्ञ नांव हो देती ॥ १ १ ॥

### ६८ चेतन—आर्या

ज्ञानादी सकल गुणीं युक्त असे जो पदार्थ कीं त्याते ॥
ह्मणती सर्वहि जाणा चेतन सर्वशशासन ज्ञातें ॥

### ६९ भावना—आर्या.

जैसी वस्तू आहे तैसाची भ्रम रहित विचारांतीं ॥
निश्चय करणें त्याला पंडित जन भावना असें ह्मणती॥१॥

### ७० अभावना—आर्या.

जी भावना विरुद्धचि मिथ्याज्ञानें हि अन्य नियमानें ॥
मानुन घेणें; समजुत करितों तुमची पहा उदाहरणें ॥१॥
जडिं चेतन वदताती जड चेतनिं निश्चयें करून सदा ॥
मानिति; अभावना तिस संशय सोडून सर्व तुह्मि वदा॥२॥

### ७१ पंडित—आर्या.

सत्यासत्य विवेकी धर्मात्मा सत्य वादि हित कारी ॥
जो सत्य प्रिय विद्वान् त्या प्रति पंडित असें हका मारी॥१॥

### ७२ मूर्ख—आर्या.

जो अज्ञानी असुरी दुराग्रहानें सदाहि भरलेला ॥
निज हित समेजना ज्या मूर्ख असें वदती सुज्ञ हो त्याला॥ १॥

### ७३ जेष्ठ कनिष्ठ व्यवहार—आर्या.

जो मान राखणें कीं जेष्ठाचा हो तसा कनिष्ठाचा ॥
त्या जेष्ठ कनिष्ठाचा व्यवहार असें ह्मणोत कीं साचा॥१॥

### ७४ सर्वहित—आर्या.

तन मन धनें करूनी उद्योगें वाढवी सुख पराचें ॥
ऐशा कृत्या लागीं ह्मणति कवी सर्व हित असें साचें ॥ १ ॥

### ७५ चोरी त्याग—आर्या.

स्वाम्याज्ञे वांचुनिया घेणें तद्वस्तु चोरि त्या वदती ॥
सोडुन देणें तिजला चोरीचा त्याग बुध असें ह्मणती ॥१॥

### ७६ व्यभिचार त्याग—श्लोक ( शार्दुलविक्रीडित )

अन्य स्त्री गमनास जो करि निज स्त्री टाकुनी सद्गुणी ॥
घाया वीर्य अकालिं शंकि न जो स्वीये स्त्रिये लागुनी ॥
तारूण्याविण लग्न जाण करणें या गोष्टिला सर्वदा ॥
बोलावा व्यभिचार, मुक्त असणें, त्या त्याग ऐसें वदा ॥१॥

### ७७ जीवाचें स्वरूप—आर्या.

चेतन असुनी इच्छा द्वेषोद्योगास जाणणारातें ॥
अल्पज्ञ, सुखासुखाचा ज्ञाता, जो नित्य, जीव वद त्यातें॥१॥

### ७८ स्वभाव—आर्या.

स्वाभाविक गुण जो ज्या वस्तूचा तो सुटे न कधिं तीचा॥
जों वरि अस्तित्व तिचें तोंवरि, वदती स्वभाव त्या साचा१।

### ७९ प्रलय—आर्या.

जयिं ईश्वर जगतातें उत्पन्न करूनि पालना उचित ॥
करि कारणरूप पुनः प्रलय असें त्यास बोलती क्वचित॥१॥

## ८० मायावी—श्लोक [ स्वागतावृत्त ]

दंभ आणि शठता कपटासी।स्वार्थता छल अहंकृति तैसी ॥
दोष हे सकल ओळखुनीयां।बोलती सुजन त्यासच माया॥१॥

### आर्या.

दंभादि सकल दोषीं युक्त असा जो असे मनुज त्यासी ॥
पंडित जन सगळे ही देती मायावि पदवि हे त्यासी ॥ १ ॥

## ८१ आप्त—आर्या.

सत्याचा उपदेष्टा धर्मात्मा कपट दोष विरहीत ॥
जो विद्वान् सर्वांवरि करुनि कृपा जगीं करीच परहीत॥१॥
अज्ञानी लोकांच्या सकल अविद्या तमास दूर करी ॥
विद्यारूपीं सूर्य; सज्जन वदती तयास आप्त तरी ॥ २ ॥

## ८२ परिक्षा—श्लोक ( अनुष्टुप )

प्रत्यक्षादि प्रमाणें हीं । सारीं आठ मिळूनिया ॥
वेद्य विद्याहि आत्म्याची।शुद्धी तैसी करूनिया ॥ १ ॥
सृष्टिक्रमानुरूपानें । विवेक करुनी महा ॥
खरें खोटें ठरविणें । परीक्षा बोलती पहा ॥ २ ॥

## ८३ आठ प्रमाणें—श्लोक ( अनुष्टुप )

शब्दानुमान प्रत्यक्ष । उपमानहि संभव ॥
अर्थापत्ति हि ऐतिह्य । अभाव आठवें असे ॥ १ ॥
ह्या आठहि प्रमाणांनीं । करिती निश्चयो जन
सत्याचा नि असत्याचा । आपुलें लावुनी मन ॥ २ ॥

## ८४ लक्षण—आर्या

ज्यायोगें वस्तूचा स्वाभाविक धर्म जाणला जाय ॥
जैसें रूपें अग्नी लक्षण त्या ह्मणति दूसरें काय ॥ १ ॥

८५ प्रमेय–श्लोक ( अनुष्टुप )

प्रमाणीं जाणला जातो । प्रतीती इंद्रियास ती ॥
येते; ह्मणूनियां त्याचें । प्रमेय त्यास बोलती ॥ १ ॥

८६ प्रत्यक्ष--श्लोक ( अनुष्टुप )

प्रसिद्ध शब्द प्रभृति । पदार्थांचे बरोबर ॥
श्रोत्रादि इंद्रियें यांचा । तैसाचि मानसावर ॥१॥
जो हो निकट संबंध । त्या योगें ज्ञान होतसे ॥
तयासी बुध ते सर्व । प्रत्यक्ष बोलती असे ॥२॥

८७ अनुमान--श्लोक ( मालिनी )

प्रथम बघुनि चिन्हां वस्तुच्या कोणत्याही ॥
मग लवकरि चिन्हीं आणुनी चित्ति पाहीं ॥
सुगम अति अशानें ज्ञान कीं होय खास ॥
ह्मणवुनि अनुमाना बोलती साधु त्यास ॥ १ ॥

८८ उपमान–आर्या.

जैसें कोणी बोले निल गायहि गाइतुल्य कीं जाण ॥
ऐशा उपमें सादृश जें होय ज्ञान तेंचि उपमान ॥

८९ शब्द–श्लोक ( इंद्रवज्रा )

जो पूर्ण आप्त प्रभु ईश्वराचा ॥
किंवा बरा आप्त मनुष्य यांचा ॥
जो बोध किंवा उपदेश यातें ॥
साधू तया बोलति शब्द जे ते ॥ १ ॥

९० ऐतिह्य–श्लोक ( अनुष्टुप )

प्रमाणांनीं अनुकूल । शद्ब जो वा न संशया ॥
जागा; न लेख खोटाही । ऐतिह्य बोलती तया ॥ १ ॥

### ९१ अर्थापत्ति–आर्या.

एका गोष्टी वरुनी ज्ञान सहज होय जाण दुसरीचें ॥
सांगितल्या वांचुनियां त्या अर्थापत्ति बोलती साचें ॥ १ ॥

### ९२ संभव–आर्या.

सृष्टीक्रमानुरूपें वा युक्तीनें तशी प्रमाणांहीं ॥
जी गोष्ट सिद्ध; तिजला संभव ऐसेंच बोलती पाहीं ॥ १ ॥

### ९३ अभाव–आर्या.

कोणी एके कोणा कथिलें उदकासि घेउनी परतें ॥
अवलोकन करूनीयां तेथें जल त्या मिळेचिना परतें ॥ १ ॥
परंतु जेथें आहे जलत्या जागे वरूनियां आण ॥
ह्याचि अभाव निमित्तें ज्ञान मिळे जें अभाव त्या जाण ॥ १ ॥

### ९४ शास्त्र–आर्या.

प्रतिपादन ज्याचें हो केलें आहेचि सत्य विद्यांनीं ॥
ज्याच्यायोगें शिक्षा जोडावी सत्य सत्य मनुजांनीं ॥ १ ॥

### श्लोक ( अनुष्टुप )

ह्या दोन्ही व्याख्या वरुनी । सज्जनांनीं दिलें अहा ॥
शोधुनी जगती सत्य । शास्त्र हें नाम त्या पहा ॥ १ ॥

### ९५ वेद–श्लोक ( अनुष्टुप )

सुयुक्त सत्य विद्यांनीं । ईश्वरोक्त असे अहा
ऋक् संहितादि चारजे । त्यांचीं जीं पुस्तकें महा ॥ १ ॥
असती त्यांचिया योगें । जें ज्ञान मनुजा प्रती ॥
होय त्या पासुनी सत्य । तयातें वेद बोलती ॥ २ ॥

### ९६ पुराण–आर्या.

प्राचीन ऐतरेया शतपथ या ब्राह्मणादिका तैसें ॥
मुनिकृत पुस्तक यांतें बुधजन कीं बोलती पुराण असें ॥ १॥

### ९७ उपवेद--श्लोक ( आर्या. )

आयुर्वेदामध्यें आहेहो वैद्य शास्त्र सांगितलें ॥
राजधर्म धनुर्वेदिं शस्त्रास्त्र ज्ञानही असे कथिलें ॥ १ ॥
गांधर्व वेदिं गायन--नियमांचें शास्त्र बोलिलें आहे ॥
प्रख्यात अर्थ वेद हि साग्र बरी शिल्पशास्त्र खनि आहे॥२॥

### ९८ वेदांग–श्लोक ( अनुष्टुप )

शिक्षा कल्प व्याकरण, । निरुक्त, छंद, ज्योतिषा ॥
आर्ष सनातना शास्त्रा । वेदांग बोलती अशा ॥ १ ॥

### ९९ उपांग–आर्या.

ऋषीमुनिकृत मीमांसा, वेदान्त न्याय योग सांख्यातें ॥
आणी छंदःशास्त्रा उपांग ह्या बोलताति सर्वांतें ॥ १ ॥

### १०० नमस्ते–श्लोक.

मान्याचि आपण आहां मान्य तुह्मा मानितों खरें मीहो ॥
नम्रपणें विनवीतों मति तुमची ज्ञानमग्न कीं राहो ॥

### श्लोक ( अनुष्टुप )

भाद्रपदीं शुक्लपक्षीं । तैसेंच भृगुवासरीं ॥
अठ्ठाशें एकविसांत । होती एकादशीतरी ॥ १ ॥
त्या दिनीं सर्व ह्या झाल्या । कविता प्राकृता मधीं ॥
वाचाव्या ह्मणुनी हस्तीं । धरोत सुज्ञते अधीं ॥ २ ॥
श्रीधराख्य पिता ज्यातें पंढरीनाथ बोलती ॥
जोशी उपाभिधा ज्याची तयाची सर्व ही कृती ॥ ३ ॥

ओऽम्

# वेद धर्म प्रचारक सभेचे नियम.

( १ )–सर्व सत्य विद्या आणि पदार्थ ज्यांचें विद्येनें ज्ञान होतें त्या सर्वांचें आदिमूल परमेश्वर आहे.

( २ )–ईश्वर सच्चिदानंद स्वरूप, निराकार, सर्व शक्तिमान्, न्यायकारी, दयाळु, अजन्मा, अनंत, निर्विकार, अनादि, अनुपम सर्वाधार, सर्वेश्वर, सर्वव्यापक, सर्वांतर्यामी, अजर, अमर, अभय, नित्य, पवित्र, आणि सृष्टिकर्ता, आहे, याचीच उपासना करणें हें योग्य आहे.

( ३ )–वेद सत्य विद्यांचें पुस्तक आहे व वेद पढणें पढविणें ऐकणें ऐकविणें, हा सर्व आर्यांचा परम धर्म आहे.

( ४ )–सत्याचें ग्रहण व असत्याचा त्याग करण्यास सर्वदा उद्यत असलें पाहिजे.

( ५ )–सर्व कामें धर्मानुसार, ह्मणजे सत्य व असत्य यांचा विचार करून केलीं पाहिजेत.

( ६ )–जगतावर उपकार करावा ह्मणजे शारीरिक, आत्मिक, व सामाजिक उन्नति व्हावी हा या समाजाचा मुख्य उद्देश आहे.

( ७ )–सर्वांबरोबर प्रीतिपूर्वक धर्मानुसार यथायोग्य वर्तन केलें पाहिजे.

( ८ )–अविद्येचा नाश आणि विद्येची वृद्धि केली पाहिजे.

( ९ )–दरएक मनुष्यानें आपआपल्या उन्नतीनेंच तृप्त न होतां सर्वांच्या उन्नतींत आपली उन्नति मानली पाहिजे.

( १० )–प्रत्येक मनुष्यानें सर्व प्रकारचे सामाजिक हितकारक नियम सामाजिक उन्नति व्हावी ह्मणून पाळण्यांत परतंत्र राहिलें पाहिजे आणि सामाजिक नियमांचें उल्लंघन न करतां अधिकाधिक हित व्हावें ह्मणून प्रयत्न करण्यास प्रत्येकजण मुखत्यार आहे.

# वेद धर्म प्रचारक सभा.

## या सभेचा उद्देश दहा नियमांत लिहिल्याप्रमाणें आहे.

सभा दर शनिवारीं संध्याकाळीं सहा वाजल्यापासून आठ वाजे-पर्यंत भरते. त्यावेळीं धर्म विषयांची चर्चा होते धर्मसंबंधीं बाबतींत ज्या कोणास शंका असतील त्यांचें यथाशक्ति समाधान करण्यांत येतें. रविवारीं सकाळीं आठ पासून दहा वाजेपर्यंत उपासने नंतर ऋग्वे-दापैकीं क्रमानें एक किंवा दोन मंत्रांचा पदपदार्थ सांगितला जातो; व सांसारिक, नैतिक, किंवा धार्मिक विषयावर आर्य सभासदाचें व्याख्यान होतें.

सर्वांनां सभेला येण्यास मोकळीक आहे. सभेसंबंधीं सर्व प्रकारचा पत्रव्यवहार वगैरे खालीं सही करणाराकडे करावा.

**सभेचें ठिकाण**—शेट गोकुळदास तेजपाळ यांची पाठशाळा, अग्यारी लेन, मुंबई.

अध्यक्ष,

**वेद धर्म प्रचारक सभा.**

## या सभेनें वेद धर्म प्रचारार्थ मराठींत प्रसिद्ध केलेलीं पुस्तकें.

| | किंमत. रु. आ. पै. |
|---|---|
| **हस्तपत्रक**—गायत्री मंत्र, धर्मलक्षण, व सर्व मनुष्य प्राण्यांनां वेद पढण्याचा अधिकार ज्या मंत्रानें सिद्ध होतो तो मंत्र, मराठी अर्थासह... ... | ०—०—६ |
| १ वैदिक संध्योपासनविधि मराठी अर्थासह... | ०—०—६ |
| २ शतशब्दरत्नमाला... ... ... | ०—०—९ |
| ३ पुराणांची उत्पत्ति पुराणें कोणी लिहिलीं याचें सप्रमाण विवेचन ... ... ... | ०—०—३ |
| ४ सत्य नारायण पूजा [छापत आहे] | |

सभेनें प्रसिद्ध केलेलीं गुजराथी पुस्तकें:—

| | |
|---|---|
| ...र्यमां सब्जेक्ट कमिटी ... ... ... | ०—३—० |
| ...नी महासभा... ... ... ... | ०—३—० |
| ...ोत्तरावली... ... ... ... | ०—१—० |
| ...त्पत्ति... ... ... ... | ०—०—३ |

या सभेकडे विकत मिळणारे आर्यतत्वदर्शक संस्कृत आणि ग्रंथः—

१ सत्यार्थप्रकाशः—यांत प्राण्यांचे एकमेकांशीं असलेले संबंध कसे घडले आहेत, कोणी घडविले आहेत किंवा आपोआप घडले आहेत ह्याचा प्रमाणपूर्वक उलगडा केला आहे. जगाचा व प्राण्यांचा संबंध काय आहे, घडविणारा कोण आहे व त्याचें व जीवाचें कोणतें नातें आहे ह्या विषयीं महान महान ऋषींचे विचार यांत गोंविले आहेत. दुसऱ्याही धर्मांची समीक्षा केली आहे... ... २–४–०

२ ऋग्वेदादिभाष्यभूमिका—वेद काय आहेत कोणीं केले आहेत त्यांत काय सांगितलें आहे अलीकडे वेदमंत्रांचा अर्थ कसा होत आहे व तो किती सयुक्तिक आहे याचें विवरण यांत केलें आहे. वेद सर्व प्रकारच्या विद्यांचे आदि-मूल आहे व त्यांतील ज्ञानानें जन्म मरणांच्या बंधनांतून सुटतां येतें आणि जगांत आल्यावर प्राण्यांनां पदार्थ ज्ञानानें सुख मिळवितां येतें. हें पदार्थविज्ञान करून देणें हा वेद मंत्रांचा मुख्य उद्देश आहे असें पुरातन ऋषींच्या ग्रंथ प्रामाण्यानें सिद्ध केलें आहे. पुनर्जन्माचें कोडें सप्रमाण सोडविलें आहे... ... ... ... ... २–८–०

३ संस्कारविधि—यांत वेदोक्त सोळा संस्कारांचे विधि सांगितलें आहेत... ... ... ... १–०–०

4— Works of Pandit Guru Datta Vidyarthi M. A.—Containing a Scientific treatment of the terminology of the Vedas with authorities of undoubted veracity and the criticism on European Scholars not excluding even Monier Williams, preaching the doctrines of Aryan philosophy in its truest light, exposing the frenzy of the scientific men who profess God to be beyond the reach of Science only omniscient without prevading the world, clearly bringing out the principles of Science contained in the Vedas, and giving in short his own views on religion with the translation of Isha, Mandukya, and Mudakopnishats. Price ' copy Rs. 1-4-0

आणखीही बरींच पुस्तकें आहेत त्यांसंबंधीं माहिती :कारक पुस्तकाध्यक्षास समक्ष भेटल्यानें किंवा पत्रद्वारें मिळेल. ने राहिलें

पुस्तक अधिकाधिक

वेद धर्म प्रचारक ार आहे.